क्र.कलि./पुरवठा/कक्ष-१२/कावि/ ४३५/२०१५,
जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कार्यालय
दिनांक :-२३/०७/२०१५

प्रति,

मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
जुने सचिवालय, पहिला माळा,
सिव्हिल लाईन,नागपूर.

विषय :- गोंदिया जिल्हयातील बारदाना निविदा सुचना वृत्तपत्रात प्रकाशित करण्याबाबत

---ooo---

महोदय,

आपणास विनंती करण्यांत येत आहे कि, सोबत जोडलेली जाहिरात खालील प्रमाणे वृत्तपत्रात प्रकाशित करण्यांत यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुळ कार्यालयाचे नांव व पत्ता | :- | जिल्हाधिकारी कार्यालय,गोंदिया(पुरवठा शाखा) |
| | (दुरध्वनी क्रमांक) | :- | ०७१८२ - २३६१५३,<br>Fax- ०७१८२ - २३६१४५ |
| २. | जाहीरात प्रकाशित करावयाची शेवटची तारीख (अंतिम दिनांक ) | :- | २९/०७/२०१५ |
| ३. | प्रकाशित करण्याचा प्रकार | :- | विभागीय स्तर/ जिल्हा स्तर |
| ४. | संबधित काम असलेला जिल्हा | :- | गोंदिया |
| ५. | जाहीराती करीता प्रस्तुत वृत्तपत्रे | :- | मराठी दैनिक - १<br>हिंदी दैनिक - १ |
| ६. | जाहीरात देयके कोणास सादर करावयाचे त्याचे नांव. | :- | जिल्हाधिकारी, गोंदिया (पुरवठा शाखा) |
| ७. | जाहीरात प्रत्येक वृत्तपत्रात किती वेळा प्रसिध्दी द्यावयाची आहे. | :- | एकाच वेळेस |
| ८. | संचालक (माहीती) यांना वृत्त पत्रात फेरबदल करण्याचे अधिकार राहतील | :- | नियमानुसार |

सहपत्र :- जाहिरात मसूद्याच्या प्रती -२

जिल्हाधिकारी,
गोंदिया.

प्रेस विज्ञप्ती

महाराष्ट्र शासन

अन्न नागरी पुरवठा विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया

पत्र क्रमांक कक्ष-१२/कलि/पुरवठा/बारदाना/कावी/४३५/२०१५ दिनांक :- २३/७/२०१५

## बारदाना विक्रीची निवीदा सुचना

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे करिता व वतीने जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे कडून गोंदिया जिल्हयातील शासकीय गोदामातील उपयोगी,निरुपयोगी व तुकडा बारदाना विक्रीसाठी ईच्छुक निवीदा धारकाकडुन मोहरबंद निविदा मागवित आहेत.

**बारदाण्याची संख्या, फॉर्मची किंमत, ईसारा रक्कम, हातची किंमत ईत्यादीचा तापशिल खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | तपशिल | उपयोगी बारदाना | | | निरुपयोगी बारदाना | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १०० किलो भरतीचा | ७५ किलो भरतीचा | ५० किलो भरतीचा | १०० किलो भरतीचा | ७५ किलो भरतीचा | ५० किलो भरतीचा | तुकडा बारदाना |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | विक्रीस उपलब्द बारदाना नगामध्ये | -- | -- | ७१२४ | -- | -- | ५७६६१ | १८५२ |
| २ | हातची किंमत प्रति नगामध्ये | -- | -- | ६.५०रु | -- | -- | २.५०रु | १.३५रु |
| ३ | निवीदा फॉर्मची किंमत रुपये | ५००/- | | | | | | |
| ४ | इसा-याची रक्कम | ३०,०००/- | | | | | | |

निवीदा पध्दती ही उदयोग उर्जा व कामगार विभागच्या क्रं.भाखंस-१०९४/(२६७९)उदयोग दिनांक ०२/०१/१९९२ तथा समक्रमांक दिनांक ३०/३/१९९४ तथा त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणानुसार उपरोक्त सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णयामध्ये दिलेल्या सुचनानुसार द्वि-लिफाफा पध्दतीचा अवलंब करण्यांत येईल.

## निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| १. | निवीदा सुचना जाहीरात प्रसिध्द करणे | २९/७ /२०१५ |
| २. | निवीदा फॅार्म विक्री करणे | २९/७ /२०१५ सकाळी १०.०० पासून ते १९/८/२०१५ दुपारी २.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत( सुटीचे दिवस वगळून) |
| ३. | इसारा रक्कम भरणे (EMD) | २९/७/२०१५ सकाळी १०.०० पासून ते १९/८/२०१५ दुपारी २.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत( सुटीचे दिवस वगळून) |
| ४. | निविदा सादर करावयाचा अंतिम दिनांक | १९/८/२०१५ दुपारी २.०० वाजेपर्यंत |
| ५. | निविदा उघडणे | २०/८/२०१५ दुपारी १२.०० वाजता. |

जिल्हाधिकारी,गोंदिया

# बारदाना विल्हेवाट निवीदा सर्वसाधारण सूचना

१. सदर निवेदेची सविस्तर माहिती अटी व शर्तीसह निविदेचा अर्जाचा नमूना व दराचा तक्ता ईत्यादीसह gondia.nic.inया संकेतस्थळावर तसेच जिल्हा पूरवठा अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे दिनांक. २९/७/२०१५ पासून दिनांक. १९/८/२०१५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून निविदा संच उपलब्ध राहतील.

२. निविदा अर्जाची किंमत रु.५००/- नापरतावा राहील. सदर रक्कम चलान द्वारे मुख्यलेला शिर्ष ०४०८ अन्न व साठवण बखार ८०० ईतर संकेतांक क्रमांक ०४०८००१५०० या लेखाशिर्ष खाली शासकिय खजिण्यात भरणा करुन मुळ चलानाची प्रत या कार्यालयात सादर केल्यानंतर निविदा अर्ज, व अटी पुरविण्यात येईल.

३. सदर निविदा द्वि-लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे .त्यामध्ये लिफाफा "अ" तांत्रीक लिफाफा राहील.तर लिफाफा "ब " दराचा लिफाफा राहील.

४ **तांत्रिक लिफाफा 'अ'** मध्ये मागविण्यात आलेले सर्व कागदपत्र जोडणे बंधनकारक आहे. संबधित कागदपत्रे न जोडल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल व दराचा लिफाफा उघडण्यात येणार नाही.

५. निविदेचा लिफाफा दिनांक.१९/८/२०१५ रोजी, दु.२.०० वाजेपर्यंत जिल्हा पुरवठा कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे स्विकारण्यात येतील.सदरच्या मुदतीत प्राप्त झालेल्या मोहरबंद निवीदा दिनांक.२०/८/२०१५ दु.१२.०० वाजता. जिल्हाधिकारी,गोंदिया यांचे सभागृहात मा.जिल्हाधिकारी यांचे समक्ष व उपस्थित निविदाधारक/निविदाधारकांची प्राधिकृत केलेले प्रतिनिधी यांच्या समक्ष उघडण्यात येतील. वरील मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.निविदाकारास निविदेमध्ये उपयोग,निरुपयोगी व तुकडा बारदान्याचे दर भरने अनिवार्य राहील.

६. निविदाकारास बारदान्यासाठी ३०,०००/- ईसारा रक्कम Collector,Gondia यांचे नावाने तयार केलेले राष्ट्रीयकृत बँकेचा दर्शनी हूंडी (Demand Draft) निविदेसोबत विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.इसारा रकमेला व्याज देय राहणार नाही.

७. निविदा पुर्णत: किंवा अशत: स्विकृत करणे किंवा कोणतेही कारण न देता अशत: किंवा पुर्णत नामंजुर करणे या बाबतचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी राखुन ठेवलेले आहेत.

जिल्हाधिकारी,गोंदिया